क्रमांक:एकत्री/दु.यो./शु.पत्रक/ए:३/२०००.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख, म.राज्य.यांचे कार्यालय.
पुणे, दिनांक: /६/२०००.

(223)

16 JUN 2000

परिपत्रक/-

विषय:- जमिन एकत्रीकरण योजना.

दुरुस्ती योजना व शुध्दीपत्रक तयार करणेबाबत.

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक कॉन/एस.आर१३४/क:१/९३ दिनांक २५.८.९३ मधील परिच्छेद ५ मध्ये दुरुस्ती योजनेचा मसुदा तयार करतांना कायम गटनंबर ९[३], ९[४] ला घेतांना चुका होतात त्याबाबत दक्षता घेणेस सुचना दिलेल्या आहेत.ही वस्तुस्थिती खरी आहे.कारण कायम हिस्से ९[३],९[४] ला घेतांना त्याकडे पुरेसे लक्ष प्रस्ताव तयार करतांना दिले जात नाही.त्यामुळे मंजूर दुरुस्ती योजनेवर अथवा शुध्दीपत्रकावर खातेदार शासनाकडे अपील दाखल करतात.

दुरुस्ती प्रस्तावात व शुध्दीपत्रकात त्या खात्यावरील तक्रारी विषयाच्या दुरुस्तीसह कायम हिस्से/गट घेतले जातात.त्यास तयारीसाठी तपासणी करण्यासाठी व खात्यावरील सर्व जमीनीचे ३ महाआतील सर्व ७/१२उतारे व इतर सर्व कागदपत्रा जमा करणेसाठी अनाठाई वेळ खर्च होतो व प्रस्तावात कायम हिस्से ओढतांना हस्तदोषा चुका राहतात.

कायम गटाची विक्री झाली असेल तर नविन खाते उघडावे लागते व गटाची पैकी खरेदी विक्री झाली असेल तर मोजणी करुन स्वतंत्र खाती उघडावी लागतात व त्या करीता सर्वाची संमती घेणेकरीता अडचणी निर्माण होतात व मूळ अर्जदाराची तक्रार निवारण न होता इतर कायम जमीनिचे अभिलेख अद्यावत करणेस कालावधी जातो.

सबब का.क.३२[१] प्रमाणे तयार करणारे दुरुस्ती प्रस्ताव व का.क.३१[अ] प्रमाणे तयार करणारे शुध्दीपत्रक बिनचुक होण्याच्या दृष्टीने व प्रकरणाचा सत्वर निपटारा होणेसाठी खालील प्रमाणे कार्यप्रणाली वापरणेबाबत सूचना देण्यात येतात.

१] तक्रारी अर्ज संबंधात संबंधित खात्यातील सर्व्हेनंबर/हिस्सा नंबर अथवा गटनंबर मध्ये दुरुस्ती होत असेल तेवढेच गट का.क.३२[१] चे दुरुस्ती प्रस्तावांत अगर का.क. ३१[अ] प्रमाणे होणाऱ्या शुध्दीपत्रकांत ९[३], ९[४] ला घेवून प्रचलीत पध्दतीप्रमाणे दुरुस्ती करावी. मंजूर योजने प्रमाणे कायम रहात असलेले गट प्रस्तावात व शुध्दीपत्रकात घेवू नयेत.

..२

उपसंचालक भूमि अभिलेख
पुणे प्रदेश पुणे
16 JUN 2000

व गटनंबर नमूद करून त्या गटनंबर पुरतेच शुध्दीपत्रक मंजूर केले आहे, असा शेरा शुध्दीपत्रक मंजूर करताना त्या खात्यावर ठेवावा.

२] दुरुस्ती प्रस्ताव अगर शुध्दीपत्रक मंजूर झाल्यानंतर ज्या गटामध्ये दुरुस्ती झाली असेल त्या संबंधित खात्यातील गटासमोर दुरुस्ती बाबतचा बाजवी तो शेरा ठेवण्यात यावा, संबंधित परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरीत करणेची आहे.

सही/- xxx
[ मोहन पहतरे ]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, म. राज्य.

प्रत/- १] उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व]
माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत/-२] अधिक्षक भूमि अभिलेख, ~~[सर्व]~~ पुणे
माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

२/- सदरचे परिपत्रकाचे छायांकित प्रति काढून त्यांचे अधिनस्त तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना पाठव्यात व सदरचे आदेशा प्रमाणे कार्यवाही करावी.

" नि र्ग मि त "

[ डी. डी. मडके. ]
जमाबंदी उप आयुक्त.
[ एकत्रीकरण ]

क्र. एकत्री/का. वि. ४६२/२०००
पुणे दिनांक १९ /६/२०००

अधीक्षक भूमि अभिलेख पुणे/सातारा/सांगली/सोलापूर व कोल्हापूर.

२/- सदरचे परिपत्रकाप्रमाणे त्वरेने कार्यवाही करणेची आहे. सदरचे परिपत्रकाच्या छायांकित प्रती काढून आपले अधिनस्त तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना पाठव्यात व परिपत्रकात दिलेल्या सुचने प्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी.

कार्य
२६

१९।६

उपसंचालक, भूमि अभिलेख
पुणे प्रदेश, पुणे. करीता.